*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

***NAVJYOT / Vol. XII / Issue - II*** ***ISSN 2277- 8063***

# शांताबाई दाणी यांचे चळवळीतील योगदान

**प्रो. डॉ. सिंधू जयवंत आवळे,** प्रमुख, मराठी विभाग,
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर, drsindhuawale9@gmail.com

---

**प्रास्ताविक:**

दलित जातीत जन्मलेल्या उच्च्यशिक्षिण घेतलेल्या आणि कुशल नेतृत्वाची समर्थता लाभलेल्या शांताबाई दाणी हे नाव अवघ्या महाराष्ट्राला परिचित आहे. दलित वस्तीत जन्मलेली शांता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने, भाषणाने प्रभावित झालेली कॉलेज कन्या, कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या प्रेरणेने,मार्गदर्शनाखाली सभा,संमेलने,संप ,मोर्चे करून तुरुंगात जाऊन राजकारण करणारी, त्यांनी दलित स्त्री आमदार म्हणून राखीव संघाचा कधी फायदा उठवला नाही.शांताबाई यांनी सदैव आपल्या दलित समाजाची आणि दलित स्त्रीची जी जातीने दलित आणि स्त्री या दोन्ही बाजूने भरडली जाणारी त्या 'स्त्री'च्या कष्टप्रद, लाचार, असहाय्य जीवन जगणाऱ्या मुलींसाठी मुलींची शाळा दलित मुलींसाठी वसतिगृह सुरु करून दलित मुलींमध्ये आत्मसन्मानाने जगण्याचे बळ निर्माण करणाऱ्या शांताबाई अशा या शांताबाई दानींची जीवन कहाणी आगळी वेगळी आहे.लोकविलक्षण आहे. त्यांनी समाजसेवेचा घेतलेला वसा निष्ठेने जपला.

**जन्म, बालपण आणि शिक्षण:**

शांताबाई दाणी यांचा जन्म १ जानेवारी१९९८साली नाशिक येथे पवित्र शहरात पण एका झोपडीत दलित कुटुंबात झाला. शांताबाईचे वडील धनाजी दुधाचा धंदा करीत. त्यांची आई मंदाबाई गवताची ओझी व्हायची. दोघेही कष्ट करणारे त्यामुळे संसार सुरळीतपणे चालू होता. शांताचे वडील गाव कुसाबाहेर राहणारे असून देखील मिशनरी शाळेत चौथीपर्यंत शिक्षण झालेले. आई मात्र अडाणी, परंतु व्यवहार कुशल हुशार शांताने शाळा शिकावी असा ध्यास तिने घेतला होता. कारण शिक्षणाने दलितांचे प्रश्न सोडवण्यासाठी मदत मिळणार होती. शांताबाई यांचे पहिली ते चौथी पर्यंतचे शिक्षण मिरज गावातील मिशनरी शाळेत. तदनंतरचे शिक्षण गावातील घणकर गल्लीत असणाऱ्या शाळेत झाले. तिथे दाणीमास्तर हे हेडमास्तर म्हणून काम करीत. अत्यंत प्रेमळ मनमिळावू व विद्यार्थ्यांवर मनापासून प्रेम करणारे. दाणीमास्तरांनी शांताला वाचनासाठी पुस्तके दिली. तिची उत्तम प्रगती करून घेतली. त्यामुळे शांताबाई सातवीची परीक्षा उत्तम पास झाल्या. सातवीनंतर पुणे येथे शिक्षिका होण्याचे ट्रेनिंग झाल्यावर कॉलेजला प्रवेश घेतला. तिथेही त्यांनी उत्तम प्रकारचे यश संपादन केले. नंतर नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यात विंचूर या गावी त्यांची प्राथमिक शिक्षिका म्हणून नेमणूक झाली. त्यानंतर गुजरात येथे बासदा या संस्था नातील शाळेत मॅट्रिकला प्रवेश घेऊन तिथेही मॅट्रिकही चांगल्या मार्कांनी पास झाल्या. पुन्हा नाशिक येथे कॉलेजचे शिक्षण पूर्ण केले.(एचपीटी) कॉलेज आणि कॉलेजचे शिक्षण करत करतच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणाने प्रभावित होऊन बाबासाहेबांचा एकेक शब्द त्यांच्या मनावर कोरला जात होता. शांता आता एका नव्या वळणावर उभी होती.एक मार्ग शिकून आपण मोठे व्हायचे आणि दुसरा मार्ग इतरांना न्याय देण्यासाठी झगडत राहायचे. या भाषणामुळे स्फूर्ती आणि राजकीय कामास प्रारंभ केला.

**शांताबाईंनी अनुभवलेले अस्पृश्यतेचे चटके:**

शांताबाई व तिच्या वडिलांना एके दिवशी एका ठिकाणी जेवायला जायचे होते. इतर माणसं घरात जेवायला बसली पण या बापलेकीला बैलाच्या गोठ्यात जेवायला बसविले. तिथे बैलाच्या शेणाचा वास येत होता. तेव्हा त्या छोट्या मनाला प्रश्न पडतो आपण साऱ्यांच्या पंक्तीत का नाही बसलो.तेव्हा तिचे वडील आपण महार आहोत.त्यांना आपले सावली सुद्धा विटाळते तेव्हा कुत्री मांजरे ही याच्या स्पर्श चालतो.जनावरांचा पण माणसाला माणसाचा स्पर्श नाही चालत.तसेच निफाड तालुक्यात किंचुर येथे प्राथमिक शिक्षका म्हणून काम करताना अस्पृश्य म्हणून त्यांना एका प्रसंगाला तोंड द्यावे लागले. शाळेच्या सहलीमध्ये एका स्टेडियमच्या देवीच्या मंदिरात शांताबाईंनी विद्यार्थिनीसोबत थेट दर्शन घेतले त्यामुळे देवीला विटाळ झाला.गावात ही बातमी वाऱ्यासारखी

पसरली.विंचूरच्या संस्थानिकांनी शांताबाईंना या संदर्भात जाब विचारला तेव्हा अजाणतेपणाने नकळत घडले, मुद्दाम प्रवेश करावा असा माझा हेतू नव्हता असे साधे उत्तर बाईंनी दिले. संस्थानिक सुधाकर मताचे असल्याने ते प्रकरण तेवढ्या वरच संपुष्टात आले.

**शांताबाईंचे चळवळीतील योगदान:**

शांताबाई दाणी नाशिक येथे कॉलेजमध्ये शिकत असतानाच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषणाने प्रेरित होऊन आपल्या दलित बांधवांसाठी आणि जनावरांप्रमाणे जीवन जगणाऱ्या आपल्या माय भगिनींसाठी झगडत राहायचे हा मनाशी ठामपणे निश्चय केला. शांताबाई या त्या काळात अत्यंत धाडसी निष्ठावान आणि हुशार म्हणून परिचित होत्या. नाशिक शहरात कॉलेजमध्ये त्या काळात सायकल वरून फिरणारी शांता कौतुकाचा विषय झाली होती. त्याकाळी नाशिकमध्ये दादासाहेब गायकवाड हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अत्यंत जवळचे. त्यांच्यासोबत काम करणारे समाजात एक आगळे वेगळे स्थान असणारे होते. आंबेडकरांच्या विश्वासातले तळमळीचे कार्यकर्ता होते. गायकवाडचे त्याकाळी अनेक दलित येत. सरकारी कचेऱ्यातील अडचणी, अन्यायाच्या तक्रारी यांच्यावर मार्ग काढण्यासाठी येत असंत. दादासाहेब शांताबाईंचे नातेवाईक असल्याने त्या गायकवाडच्या कार्यालयात जाऊन बसत. तिथे कार्यालयातील पत्रे लिहित, अर्ज लिहायचे. अशा कामात त्या मदत करायला तत्पर असत तेव्हा लोकांचे प्रश्न समजू लागले. सरकारी अधिकारी कामे कशाप्रकारे करतात हे त्यांच्या लक्षात येऊ लागले. हळूहळू दादासाहेब गायकवाड सोबत सभांमध्ये भाषणे एकूण कोणता प्रश्न कधी मांडावा याचा अभ्यास करू लागल्यानंतर शांताबाईंना लोक ओळखू लागले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना केली. १९४ साली दलितांनी असेंबलीवर सत्याग्रह करण्याचे ठरविले.त्यात शांताबाईंनी पुण्याच्या असेंबलीवर सत्याग्रह केला. त्यांना अटक झाली. येरवड्याच्या तुरुंगात तीन आठवडे राहण्याची शिक्षा झाली हा त्यांचा पहिला तुरुंगवास. तुरुंगात त्यांनी स्त्रियांचे प्रबोधन करून बाबासाहेबांचे विचार बिबवीत होत्या. मध्यप्रदेशातील रायपूर या ठिकाणी दरवर्षी चांभार समाजाची यात्रा भरत असे. तिथे जाऊन शेडूल्ड कास फेडरेशनची माहिती लोकांना देण्याचे काम डॉ. आंबेडकरांनी दादासाहेब गायकवाड यांना सांगितले त्यानुसार शांताबाई दानी आणि श्री बापूसाहेब राजभोज यांची निवड झाली. त्या दोघांना नियमांचे हस्तक म्हणून रायपूर येथे अटक करण्यात आली आणि एक महिना शांताबाई व राजभोज यांना जबलपूरच्या तुरुंगात ठेवले गेले शांताबाईचा हा दुसरा तुरुंगवास. तुरुंगातून सुखरूप सुटल्यावर जबलपूरच्या दलितांनी आणि नागपूरलाही मोठा सत्कार करण्यात आला. केलेल्या कामाची ही पोचपावती होती. दलितांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यात चळवळीचा एक भाग होऊ लागल्या. यथावकाश संपूर्ण मुंबई प्रांताच्या शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या सदस्य झाल्या. त्यानिमित्ताने अवघा महाराष्ट्र पालथा घातला. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' या उक्ती प्रमाणे अत्यंत जबाबदारीने त्यांनी कार्याला वाहून घेतले. १९४७-४८ ला फाळणी झाल्यावर पाकिस्तानात त्यांच्यावर अत्याचार झाले.त्यात चांभार समाजातील अनेक स्त्री पुरुष निर्वासित म्हणून नाशिकला आले. तेव्हा त्यांना धीर देणे, त्यांना आर्थिक मदत करणे हे काम अगदी नेटाने शांताबाईंनी केले. १९५६ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कार्यकर्त्यांची बैठक नागपूरला बोलावली. त्या बैठकीला शांताबाई जातीने हजर होत्या सर्वांनी धर्मांतर करावयाचे असे ठरविले. नागपूरच्या दीक्षांत भूमीत लाखो लोकांनी १४ऑक्टोबर १९५६ साली डॉ. बाबासाहेबांनी स्वतः सर्व दलित जनसमुहाला धर्मांतराच्या दीक्षा दिली. त्यावेळी शांताबाई दाणींनी धर्मांतर करून बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. कालांतराने बाळासाहेबांच्या महापरिनिर्वाणनानंतर हळूहळू दलित चळवळीत फाटा फूट सुरू झाली. विधानसभा, लोकसभेत प्रतिनिधित्व कोण करणार यावरून संघर्ष निर्माण होऊ लागला. शेडूल्ड काष्ट फेडरेशनच्या पक्षात अस्वस्थता निर्माण झाली. याचे प्रचंड दुःख शांताबाईंना झाले. त्या काळात त्या अस्वस्थ झाल्या. डॉ. बाबासाहेबांचा मूळ मंत्र शिक्षण घ्या संघटित व्हा संघर्ष करा याचा अवलंब करण्यासाठी दलितांना शिक्षण दिले पाहिजे त्यात प्रामुख्याने दलित स्त्रीला शिक्षण देऊन तिच्यामध्ये स्वाभिमान जागृत करण्याचा निश्चय शांताबाईंनी केला. १९८२ साली रमाबाई आंबेडकर शाळेची स्थापना केली. यथावकाश प्राथमिक शाळा, विविध विद्यालय, मुलींची वस्तीगृह यांचे सरचिटणीस म्हणून नियमितपणे कामकाज करीत राहिल्या.